CMYK

बीड । बुधवार

०९.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : ९९

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# बीड नगरपालिका किरण देशमुख यांच्या नावावर ?



## कार्यालयात न येणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणाचे वरदहस्त !, बांधकाम विभागावर मेहरबानी ; स्वच्छता, पाणीपुरवठा व विद्युत विभाग वाऱ्यावर ! डिझेलचे पैसे थकवले ; पंप चालकाने डिझेल केले बंद !

## कंत्राटी कामगाराचा पगार द्यायला पैसा नाही ?

## बांधकाम विभागातील कोट्यावधीची बिले सर्रास काढली जात आहे !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका आपल्या सातबारावर असल्यासारखं येथील बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख वागत असून नगरपालिका न येता कोट्यावधी रुपयांचे नगरपालिका फंडातील कामांचे बिले कशी दिली जात आहे. याची चर्चा नगरपालिका परिसरात होत असून कायम स्वरूपी मोबाईल बंद असलेल्या किरण देशमुख यांना दिले काढण्यात वेळ कधी मिळत आहे. बीड नगरपालिकेची त्यांच्याच कार्यालयाची सीसीटीव्ही फुटेज तपासा दूध का दूध व पाणी का पाणी होईल. बीड नगरपालिकेतील ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● किरण देशमुख यांच्यावर नगरपालिका मेहरबान का ?

बीड नगरपालिकेत न येता बांधकाम विभागातील नगरपालिका फंडाची विल्हेवाट लावणाऱ्या किरण देशमुख यांच्यावर नगरपालिका प्रशासन एवढे मेहरबान का ? असा प्रश्न नगरपालिका कर्मचाऱ्यासह बीड शहरातील गुत्तेदार व सामान्य नागरिकांनाही पडला आहे. किरण देशमुख यांचे कोणते कर्तव्य आहे ज्यामुळे नगरपालिका कार्यालयात न येता नगरपालिका प्रशासन त्यांचा नियमित वेतन देत आहे. किरण देशमुख यांच्यावर अनेक घोटाळे असल्याचा आरोप विविध संघटनेने केला आहे याची साधी चौकशीही नगरपालिका करणार आहे का ? नगरपालिका कार्यालयातील मागील तीन महिन्याचे सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास किरण देशमुख हे कार्यालयात कधी येतात व कधी जातात याची निश्चित माहिती सर्वसामान्यांना मिळेल.

### ● कर्तव्यावर न येणाऱ्या देशमुखांना निलंबित करा

नगरपालिका विभागात महत्त्वपूर्ण विभागाचे प्रमुख असलेल्या किरण देशमुख यांना कार्यालयात येण्यास वेळ मिळत नसल्याने त्यांना तात्काळ निलंबित करून घरी बसवण्याची मागणी विविध सामाजिक संघटनांकडून केली जात आहे. खाजगी कार्यालयात बसून कामे करणारे शासकीय अधिकारी यांच्यावर जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासन यांचे लक्ष नाही का . मागील तीन महिन्यात बांधकाम विभागाने नगरपालिका फंडातून काढलेले कोट्यावधी रुपयांची बिलाची चौकशी होणार आहे का ?

### ● यंग जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन नगरपालिका प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी देशमुखवर कारवाई करतील का ?

बीड येथे डॅशिंग जिल्हाधिकारी म्हणून विवेक जॉन्सन यांचे सर्वसामान्य नाव घेत आहे प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करण्यास मागेपुढे न पाहणारे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यात जिल्हाधिकारी कार्यालयात नगरपालिका प्रशासन विभाग कार्यरत आहे. नगरपालिका वर प्रशासकीय राज असून बांधकाम विभागातील अभियंता किरण देशमुख सारखे भ्रष्ट अधिकारी यांच्यावर नगरपालिका प्रशासन अंकुश ठेवत नसल्याने नगरपालिका न येता कोट्यावधीची बिले काढणाऱ्या किरण देशमुख यावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कारवाई करतील काय ?

### ● किरण देशमुख यांचा मोबाईल नेहमीच स्विच ऑफ !

नगरपालिका बांधकाम विभागांमध्ये महत्त्वाचे कामासाठी आलेल्या प्रत्येक नागरिकाला किरण देशमुख नावाच्या कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांचा मोबाईल नेहमीच बंद आढळतो. कर्मचारी अधिकाऱ्यांनाच त्यांना बोलण्यासाठी इतर व्यक्तीची मदत घ्यावी लागते तर सर्वसामान्य व्यक्तीला किरण देशमुख बोलणार कसा . कामानिमित्त येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हा अनुभव आला असून शासकीय अधिकारी कार्यालयीन वेळेतही मोबाईल स्विच ऑफ ठेवत असल्याने कामासाठी आलेल्या अनेकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

# खाजगीकरणच्या विरोधात आज भारत बंद

## २५ कोटी कामगार रस्त्यावर ; देशातील प्रमुख सेवावर परिणाम

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देशभरात केंद्र शासनाकडून खाजगीकरण करण्यात येत आहे या विरोधात देशभरातील कामगार संघटनांनी देशव्यापी बंद पुकारला आहे . या बंदमध्ये देशभरातील २५ कोटी पेक्षा जास्त कामगार सहभागी होणार आहे. या बंदचा थेट परिणाम देशभरातील प्रमुख शासकीय सेवेवर होणार आहे. कामगारांच्या मागण्यांकडे केंद्र शासनाने दुर्लक्ष केल्याने कामगार संघटनांनी बंद चे हत्यार उपसले आहे. या बंदमुळे शहर व ग्रामीण




भागातील प्रमुख सेवा वर परिणाम होण्याची शक्यता आहे.

कामगार मंत्रालयाकडून कामगारांच्या तब्बल १७ मागण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. कामगारांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याने अखेर आज कामगारांनी भारत बंदची घोषणा केली आहे. केंद्र सरकारच्या खासगीकरणाच्या आणि कामगार कायद्यांच्या विरोधात देशातील कामगार संघटनेने ९ जुलै रोजी भारत बंदची घोषणा ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● भारत बंदमध्ये काय बंद राहील ?

- बँकिंग सेवा
- विमा कंपन्यांचे काम
- पोस्ट ऑफिस
- कोळसा खाणींचे काम
- राज्य वाहतूक सेवा (सरकारी बसेस)
- महामार्ग आणि रस्ते बांधकाम सरकारी कारखाने आणि कंपन्यांचे उत्पादन.

### ● काय सुरू राहील ?

- बहुतेक खासगी क्षेत्रातील ▶ कंपन्यांचे काम सुरू असेल.
- रुग्णालये, वैद्यकीय आपत्कालीन सेवा सामान्य राहण्याची अपेक्षा आहे.
- खाजगी शाळा / महाविद्यालये आणि ऑनलाइन सेवा.

# परळी वैद्यनाथ औष्णिक विद्युत केंद्रातील बंद संचांच्या जागेत उभारणार सौर ऊर्जा प्रकल्प

## नवीन नववा संच उभारण्यातील तांत्रिक अडचणी समजून घेत त्या दूर करण्यासाठी लवकरच व्यापक बैठक ; धनंजय मुंडे यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली विधानसभेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभेत आ. धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेल्या एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी वैद्यनाथ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्याचे घोषित केले आहे. त्याचबरोबर याच औष्णिक विद्युत केंद्रात शिल्लक असलेल्या जागेत नवीन ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● सहा महिन्यांनंतर धनंजय मुंडे सभागृहात बोलले ; अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणी !

दरम्यान महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर सुमारे सहा महिन्यानंतर धनंजय मुंडे यांनी आज सभागृहात प्रथमच तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून भाषण केले ; अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी, संयमी पण प्रखर बोलणे, मुद्याशी खिळून राहणे व ठेवणे, सभागृहाचा डेकोरम सांभाळणे या सर्वच बाबींची काळजी घेऊन सभागृह गाजविणारे धनंजय मुंडे आज पुन्हा एकदा पाहायला मिळाले.

# आ. संदीप क्षीरसागरांनी महावितरणाचा मुद्दा विधानभवनात गाजवला

## प्रस्ताव मंजूर होत नाही अन् झाले तर कामे लवकर होत नाहीत ; हायटेक कंपनीच्या चौकशीची केली मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील वीज, पाणी, रस्ते, स्वच्छता यासह नागरीकांच्या दैनंदिन अडचणींवर लक्ष केंद्रित केले आहे. अनेकवेळा महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन ही काहीच फरक पडत नसल्याने, सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उत्तर

### ● साक्षी कांबळे प्रकरणाचीही चौकशी करण्याची केली मागणी

बीडमध्ये तीन–चार महिन्यांपूर्वी साक्षी कांबळे या मुलीने आत्महत्या केली होती. छेडछाड आणि मानसिक त्रासाला कंटाळून साक्षी कांबळे हीने आत्महत्या केली होती. या प्रकरणात हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस उपाधीक्षक स्वप्नील राठोड यांच्यावर नीलंबनाची कारवाई करण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर सभागृहात केली. यावर गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी कारवाईचे आश्वासन दिले.

# मोर्चेकऱ्यांकडून 'गो बॅक'ची नारेबाजी, अंगावर बाटली फेकली, प्रताप सरनाईकांचा मोर्चातून काढता पाय

**मीरा–भाईंदर। वृत्तसंस्था**

अमराठी व्यापाऱ्यांच्या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून मनसे आणि मराठी एकीकरण समितीने काढलेल्या आजच्या (दि.८ जुलै) मोर्चात आमदार प्रताप सरनाईक सहभागी झाले होते. पण ते मोर्चात सहभागी होताच त्यांच्या विरोधात, मोर्च्याकडून 'गो बॅक'ची नारेबाजी करण्यात आली. ५० खोके, एकदम ओके'च्या घोषणाही यावेळी देण्यात आल्या. सरनाईक यांच्या अंगावर बाटली फेकण्याचाही प्रयत्न करण्यात आला. या ठिकाणी धक्काबुक्कीही झाली. यानंतर प्रताप सरनाईक



यांना मोर्चातून काढता पाय घ्यावा लागला. हा मोर्चा मीरा रोडवरील रेल्वे स्टेशनजवळ आहे. येथे मोठी गर्दी पाहायला मिळाली.

सरनाईक मोर्चात आले, पण.. एका दुकानदाराला मनसेच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण

▶▶ उर्वरित पान २ वर

# एसटी चालकाला पिस्टल दाखवून धमकावणाऱ्यांना शिवाजीनगर पोलिसांनी एका तासात केली अटक



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील स्थानक परिसरात बनावट पिस्तुल दाखवून बस चालकाला धमकावणाऱ्या दोघा तरुणांना शिवाजीनगर पोलिसांनी केवळ एका तासाच्या आत शोधून काढले आणि जेरबंद केले. ही घटना सोमवारी (दि. ७ जुलै) रात्री साडेआठच्या सुमारास बीड एसटी स्थानकाच्या इन गेटजवळ घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना ताब्यात घेत गुन्ह्यात वापरलेली बनावट पिस्तुल आणि बुलेट दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

फिर्यादी इरफान निजाम शेख (वय ३६, रा. नवगण राजुरी) हे एसटी स्थानक परिसरात थांबले असताना, त्यांच्या ओळखीचे एक व्यक्ती आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन तरुणांमध्ये झटापट आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये गोहत्या कधी थांबणार; आषाढीच्या मुहूर्तावर केजमध्ये सापडले आयशरभरुन मुंडके, हाडांचे सांगाडे

## बीडचे गोहत्या व गोतस्करीचे जाळे मुंबई–पुण्यापर्यंत पसरलेले : प्रशांत डोरले, किशन चौहाण

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गोवंशाचे कत्तल होण्याचे प्रमाण वाढले असून, चोरट्या पद्धतीने गाय, बैल, कालवड, म्हैस सारख्या प्राण्यांची वाहतूक करून निर्मनुष्य ठिकाणी ही कत्तल करून गोमाता व गोवंशाचे सापळे, शिर, कातडी, हाडे, कातडी, सांगाडे इ. सह अन्य गोष्टी पुरावा सापडू नये म्हणुन नष्ट करण्याच्या उद्देशाने बीड शहराच्या सोबतच अन्य ग्रामीण परिसरात तसेच निर्मनुष्य भागात नेऊन विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने पुरण्यात येत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच बीड शहराच्या जवळ असलेल्या गोरे वस्ती, बांगरनाला परिसरात असेच २५ते३० गोवंशाची हत्या केलेली आढळून आलेली होती, यातील आरोपी निष्पन्न होऊन अटक होण्याच्या आधीच केज तालुक्यात दुसरी घटना घडल्याने ▶▶ उर्वरित पान २ वर



### मुंबई येथील साकीनाका येथे सापडलेल्या गोहत्याचे नेटवर्क बीडचे असल्याचे पुरावे

मुंबई येथील साकीनाका या परिसरात झालेल्या कारवाईमध्ये मोठ्या प्रमाणावर गोमांसाची कत्तल झाल्याचे पुरावे असून त्याचे कनेक्शन ही बीड जिल्ह्यातीलच असल्याचे चांदिवलीचे आ. दिलीप लांडे साहेब यांनी विधानसभा अधिवेशनात कालच तारांकित प्रश्न करत माहिती दिली आहे.




CMYK

# पावसाळ्यात भेंडी आणि वांगी व्यतिरिक्त, या भाज्या खाणे टाळावे

**पावसाळा येताच सर्वत्र हिरवळ पसरते. थंड वाऱ्यासह हलका पाऊस मनाला नक्कीच शांत करतो, परंतु हा ऋतू आपल्यासोबत अनेक आजारही घेऊन येतो. विशेषत: या काळात, अन्नात थोडीशी निष्काळजीपणा आरोग्यावर परिणाम करू शकतो.**



● आहार तज्ञांचे म्हणणे आहे की पावसाळ्यात आर्द्रता आणि तापमानातील चढउतारांमुळे बॅक्टेरिया आणि बुरशी वेगाने वाढतात, ज्यामुळे अन्नपदार्थ लवकर खराब होतात. पावसाळ्यात काही भाज्या खाऊ नयेत, अन्यथा त्यामुळे अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. चला तर मग जाणून घेऊया पावसाळ्यात कोणत्या भाज्या खाऊ नयेत.

● पावसाळ्यात कोणत्या भाज्या टाळाव्यात ? हिरव्या पालेभाज्या टाळा

● हिरव्या पालेभाज्या खाणे आरोग्यासाठी फायदेशीर असले तरी, पावसाळ्यात पालक आणि मेथीसारख्या पालेभाज्या खाणे टाळावे कारण पालेभाज्या ओलावा आणि घाण लवकर शोषून घेतात.या काळात बॅक्टेरिया आणि कीटकांचा धोका देखील असतो. अशा परिस्थितीत, तुम्ही त्यांना कितीही चांगले धुतले तरी, काही कण त्यांच्यावर राहतात, ज्यामुळे अन्न विषबाधा होऊ शकते .

● भेंडी खाणे टाळा– भेंडी ही सामान्यतः खूप पौष्टिक मानली जाते, परंतु पावसाळ्यात ही चिकट भाजी लवकर खराब होते. ओलाव्यामुळे, भेंडीमध्ये बॅक्टेरिया आणि बुरशी वाढू शकतात, ज्यामुळे पोटात गॅस, आम्लता किंवा संसर्ग होतो.

● काकडी खाणे टाळा– पावसाळ्यात कच्च्या भाज्या आणि काकडी आणि खीरा सारख्या सॅलड खाणे देखील टाळावे. ओल्या हवामानात त्यावर बॅक्टेरिया आणि विषाणू वेगाने वाढतात. योग्य स्वच्छता न करता त्यांचे सेवन केल्याने पोटदुखी, अतिसार किंवा संसर्ग होऊ शकतो.

● मशरूम खाणे टाळा– मशरूम आधीच ओलसर वातावरणात वाढतात. पावसाळ्यात ते लवकर खराब होतात. तथापि, जर बाजारात उपलब्ध असलेले मशरूम थोडेसे काळे किंवा मऊ दिसले तर ते खरेदी करू नयेत. कारण, जर मशरूम थोडेसेही दूषित असेल आणि तुम्ही ते खाल्ले तर अन्नातून विषबाधा होण्याचा धोका वाढतो. तसेच, पोटाशी संबंधित समस्या देखील उद्भवू शकतात.

● वांगी देखील खाऊ नका– वांगी ही देखील अशा भाज्यांपैकी एक आहे जी लवकर खराब होते. पावसाळ्यात वांग्यावर अनेकदा कीटकांचा प्रादुर्भाव होतो. अशा परिस्थितीत, जर तुम्ही पावसाळ्यात वांगी खाल्ल्यास सूज येणे, पोटदुखी आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या उद्भवू शकतात

● या भाज्यांचे सेवन करा – या भाज्यांव्यतिरिक्त, काही भाज्या आहेत ज्या तुम्ही पावसाळ्यात खाऊ शकता. उदाहरणार्थ, पावसाळ्यात दुधी खाणे खूप चांगले आहे. याशिवाय, तुम्ही पावसाळ्यात दुधी भोपळा, परवल आणि क्लस्टर बीन्स देखील खाऊ शकता. तज्ञांच्या मते, या भाज्यांमध्ये आर्द्रतेचे प्रमाण कमी असते, जे पावसाळ्यात खाण्यास सुरक्षित असते.

● अस्वीकरण (Disclaimer) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत दै. मराठवाडा पत्र कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

पान १ वरून पुढे...

## बीड नगरपालिका...

स्वच्छता विभाग व पाणीपुरवठा विभागासह विद्युत विभागातील अनेक गुत्तेदारांचे बिले अडकवली जात आहे. मात्र बांधकाम विभागावरच एवढी मेहरबानी का ? स्वच्छता विभागात कार्यरत असणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉली जेसीबी व घंटा गाड्यांना डिझेल मिळत नाही तर दुसरीकडे विद्युत विभागात कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांच पगार थकले आहेत. तर पाणीपुरवठा विभागातील केलेल्या कामांची बिले अद्यापही काढण्यात आलेली नाही. नगरपालिका प्रशासनाचा सर्व फोकस फक्त बांधकाम विभागावरच आहे. नगरपालिका फंडातून केलेल्या कामांची बिले काढण्यात येत असून बांधकाम विभागावर मेहरबानी व स्वच्छता पाणीपुरवठा व विद्युत विभाग वाऱ्यावर सोडले असल्याचे चित्र नगरपालिकेत दिसत आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी बीड शहरातील मूलभूत गरजा भागवण्याची जबाबदारी नाकारली आहे का. नगरपालिका विविध विभाग महत्त्वपूर्ण आहेत मात्र ज्या विभागात अधिकारी कधीही कारल्यात येत नाही त्या विभागाचे बिले काढण्यात येत आहेत. किरण देशमुख नावाचा व्यक्ती बांधकाम विभागाला बोटावर नाचत आहे हे महाशय नगरपालिका कार्यालयात कधीच उपलब्ध नसतात. मात्र बिले काढण्यात सर्वात पुढे असतात. नगरपालिकेचे मागील तीन महिन्याचे सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास या किरण देशमुख यांचा खरा चेहरा उघडा होईल. एकीकडे शहरातील महत्त्वपूर्ण असणाऱ्या स्वच्छता विभागाकडे कंत्राटी कामगारांचा पगार थकोवला जातो यासोबत डिझेल चे पैसेही पेट्रोल पंप चालकांना न दिल्याने नगरपालिकेचे वाहन जागेवरच उभे आहेत. एकीकडे बांधकाम विभागाला पैसे देण्यासाठी नगरपालिका सर्व नियम धाब्यावर बसवत असून स्वच्छता पाणीपुरवठा व विद्युत विभागाला मात्र फंड नसल्याचे कारण देत आहे.

## खाजगीकरणच्या विरोधात...

दिली आहे. बुधवारी होणाऱ्या या बंदमध्ये देशभरातील २५ कोटी कामगार भाग घेणार असल्याची माहिती आहे. त्यामध्ये बँकिंग, खाणकाम, पोस्टल सर्व्हिस, बांधकाम यासह अनेक क्षेत्रातील कामगार या बंदमध्ये सहभागी होणार आहे. त्यामुळे देशातील प्रमुख सेवांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. देशातील १० प्रमुख कामगार संघटनांनी या भारत बंदची घोषणा केली आहे. त्याचसोबत या संघटनांच्या संबंधित इतर कामगार संघटनांही त्यामध्ये भाग घेणार असल्याची माहिती आहे. केंद्र सरकारने कामगार विरोधी, शेतकरी विरोधी धोरण अवलंबल्याचा आरोप या संघटनांनी केला आहे. सरकारच्या या धोरणांचा फायदा केवळ उद्योगपतींना, त्यांच्या उद्योगांना होणार असल्याचा आरोप कामगार संघटनांनी केला आहे. ुधवारी, ९ जुलै रोजी होणाऱ्या बंदमध्ये देशातील शहरी भागांसह ग्रामीण भागांतील कामगारही सहभागी होणार असल्याचं कामगार संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आलं आहे. देशव्यापी संपादरम्यान अनेक अत्यावश्यक सेवा बंद राहू शकतात. त्याचा परिणाम सर्वसामान्य लोकांवरती होण्याची शक्यता आहे.

## परळी वैद्यनाथ....

नवव्या संचाची उभारणी करण्याबाबत काही तांत्रिक अडचणी आहेत, त्यावर आज चर्चा झाली असली तरी या संदर्भात एक व्यापक

पान १ वरून पुढे...

बैठक घेऊन सकारात्मक मार्ग काढू, असे आश्वासनही श्री फडणवीस यांनी दिले आहे. परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्रात निष्कासित करण्यात आलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेवर अधिक क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारून त्याद्वारे हरित ऊर्जा निर्मिती केली जावी, त्याचबरोबर संच क्रमांक ८ च्या तुलनेत अधिक वीज निर्मिती क्षमता असलेला संच क्रमांक ९ नव्याने उभारण्यात यावा अशी मागणी आज तारांकीत प्रश्नाव्दारे उपस्थित केली, त्यास श्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिले. नवव्या संचाची उभारणी करण्याबाबत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार शासनाने विचार केला असता, विजेची मागणी, कोळसा खरेदी मधील भावाची तफावत, कोळसा वाहतुकीस लागणारा खर्च आदी तांत्रिक अडचणी असल्याचे श्री फडणवीस यांनी नमूद केले. त्यावरून धनंजय मुंडे यांनी प्रचलित पद्धतीने कोळसा खरेदी करणे ऐवजी वेस्टर्न कोल्डफिल्ड लिमिटेड किंवा महानंदी कोल्डफिल्ड लिमिटेड यांच्याकडून तोच कोळसा कमी दरात उपलब्ध केला जाऊ शकतो, शिवाय आवश्यक जमीन, पाणी आदी सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असून, याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, याकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीला मान्यता देत असल्याचे सांगत नवीन नवव्या संचाची उभारणी करणे संदर्भात एक व्यापक बैठक घेऊन त्यात सर्व मुद्दे व तांत्रिक बाबींचा अभ्यास करून, योग्य सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले आहे.

## आ. संदीप क्षीरसागरांनी...

सत्रात महावितरण कंपनीच्या गलथान कारमाराची चिरफाड केली. बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यात महावितरणचा गलथान कारभार सुरू आहे. या विरोधात आज आ. संदीप क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करीत महावितरण आणि कॉन्ट्रॅक्टर यांच्या मिलिभगतवर बोट ठेवत चिरफाड केली असून, आधीच प्रस्ताव मंजूर होत नाही आणि झाले तरी काम लवकर पूर्ण होत नाही. तसेच मागील दोन वर्षांपासून आरमोड केबल चे काम पूर्ण न केलेल्या हायटेक कंपनीची चौकशी करावी अशी मागणी केली. आ.क्षीरसागर म्हणाले की, महावितरणचे कोणतेही काम असले की, प्रथम आरडीएसएस योजनेचे नाव पुढे केले जाते. या योजनेतून एखादे काम करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला तरी त्यास लवकर मंजुरी मिळत नाही. मंजुरी मिळाली तर ते काम लवकर होत नाही. माझ्या शहरात १५ सप्टेंबर २०२३ पासून मंजूर असलेले आरमोड के बल टाकण्याचे काम सुरु आहे. दोन वर्ष झाली हे कामच पूर्ण होत नाही. हे काम हायटेक कंपनीकडून करण्यात येत आहे. हा गैरप्रकार महावितरण आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू आहे. यासोबतच बीड तालुक्यातील पाली येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र मंजूर आहे. परंतु याचे काम सुरू नाही. तसेच ११ के.व्ही. लाईन बदलणे, तसेच जीर्ण तारा बदलने, पोल शिफ्टिंग अशी कामे कधी होणार आहेत ? आणि दोन वर्षांपासून केबल टाकण्याचे काम संथगतीने करणाऱ्या हायटेक कंपनीची चौकशी करणार का ? असे प्रश्न आ. क्षीरसागर यांनी सभागृहात उपस्थित केले.

## मोर्चेकऱ्यांकडून...

पान १ वरून पुढे...

झाल्याच्या निषेधार्थ अमराठी व्यापाऱ्यांनी मीरा रोडवर मोर्चा काढला. त्याला प्रत्युत्तर म्हणून मनसे आणि मराठी एकीकरण समितीने आज मंगळवारी मीरा रोडवरुच मोर्चा काढला. पोलिसांनी या मार्गावर मोर्चा काढण्यास परवानगी नाकारली. तरीही ठरलेल्या मार्गानेच मोर्चा निघाला. दरम्यान, पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देत मनसे कार्यकर्त्यांची धरपकड केली. या कृतीचा ओवळा–माजिवडा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी निषेध नोंदवला.

मी स्वतः मीरा भाईंदरला मोर्चात सहभागी होण्यासाठी जात असून पोलिसांची हिंमत असेल तर मला अडवून दाखवावं, असे आव्हान प्रताप सरनाईक यांनी दिले. त्यानुसार ते मोर्चात सहभागीही झाले. पण त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ते मोर्चातील गर्दीत असताना त्यांच्या दिशेने एक पाण्याची बाटलीही फेकली. यामुळे ते मोर्चातून बाहेर पडले.

सरकार गुजरातचे आहे की महाराष्ट्राचे ? ; संदीप देशपांडेंचा सवाल

मनसेचे मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे यांनी, 'तुम्हाला हे सर्व थांबवायचे असेल तर मोर्चाला परवानगी द्या' अशी भूमिका स्पष्ट केली. मीरा भाईंदरमध्ये व्यापाऱ्यांच्या मोर्चाला परवानगी दिली जाते. आम्हाला का नाही ? असा सवाल त्यांनी केला. ते आम्हाला म्हणतात घोडबंदरला मोर्चा काढा. मीरा–भाईंदरला घटना घडली आणि मोर्चा घोडबंदरला ... उद्या सांगाल कणकवलीला मोर्चा काढा. मी मार्ग बदलायला तयार होतो. मात्र मीरा रोडचा मोर्चा तुम्ही घोडबंदरला काढायला सांगणार असाल तर हे आम्ही सहन करणार नाही. याचा अर्थ पोलिसांना परवानगी द्यायचीच नव्हती. पोलिसांना हे प्रकरण चिघळवायचं होतं का हा आम्हाला संशय आहे. जर आमचा शांतपणे मोर्चा होता. तर परवानगी का दिली नाही ? असा सवालही संदीप देशपांडे यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात जर मराठी माणसाच्या मोर्चाला परवानगी देणार नाही आणि गुजराती माणसांच्या मोर्चाला परवानगी देत असाल तर सरकार गुजरातचे आहे की महाराष्ट्राचे ? हा आमचा प्रश्न आहे, असेही ते पुढे म्हणाले.

## एसटी चालकाला...

शिवीगाळ सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी हस्तक्षेप करताच त्यातील एका जाड बांध्याच्या तरुणाने त्यांना तुझा काय संबंध ? असे म्हणत कंबरेतून पिस्तुल काढून धमकावले आणि त्यानंतर बुलेट मोटरसायकलवरून (MH 23 BM 7387) साथीदारासह पसार झाला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून तपासासाठी दोन पथके तयार केली. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर काही वेळातच आरोपी अभिजीत दिलीपराव जाधव (वय २३, रा. पंचशील नगर) याला नालंदा कॉलनी परिसरातून, तर दुसरा आरोपी अभिजीत कमलाकर कांबळे (वय २३, रा. माळीवेस) याला माळीवेस परिसरातून ताब्यात घेण्यात आले. अटकप्रसंगी आरोपी अभिजीत कांबळे याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली लोखंडी बनावट पिस्तुल (किंमत सुमारे १०,००० रुपये) आणि मोटारसायकल जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे आरोपी अभिजीत कांबळे याच्यावर यापूर्वी जबरी चोरीचा गुन्हाही

पान १ वरून पुढे...

दाखल आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कौवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मिना यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे निरीक्षक किशोर पवार आणि त्यांची टीम, स्थागुशा बीडचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि सिद्धेश्वर मुरकुटे, आणि इतर पोलिस अंमलदारांनी केली. गुन्ह्याचा पुढील तपास सफौ खेडकर हे करत आहेत.

## बीडमध्ये गोहत्या...

प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण होत आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, कालपरवा हिंदू धर्माच्या दृष्टीने पवित्र असलेल्या आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे दिनांक ०६ जुलै २०२५ बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील विडा ते शेंडी मार्गावर कारेगाव या ठिकाणी एक आयशर (ट्रक) भरून गोवंशाचे मुंडके हाडे जात असल्याची माहिती गोरक्षक केशव रत्नपारखे व अन्य यांना मिळताच तातडीने डायल ११२ वर कॉल करून माहिती देत गोरक्षकांनी ही गाडी अडवली असता यात अंदाजे ४००– ५०० गाय, बैल, म्हैस, कालवड यांच्या कत्तल केल्याली असल्याचे प्राथमिक दिसून आले, प्रकरणाचे गांभीर्य ओळखत केज पोलिस स्टेशनचे पीआय उनवने साहेब यांच्या पथकाने तातडीने या ठिकाणी धाव घेत प्रकरणाची खातरजमा केली असता एक विटकरी रंगाचा आयशर टॅम्पो पासिंग क्रमांक MH12HD3348 हा रोडच्या बाजूला ऊभा होता. त्याची पोलिसांनी तपासणी केली असता त्यामध्ये अवैधरित्या गायी, म्हसी व बैल यांचे हाडांचे सांगाडे, मुंडक्याच्या कवट्या, पायांचे सांगाडे मांस व हाडे असे भरलेले मिळून आले. सदर गाडी चालक नाव अकबर ईस्माईल टकारी वय ४५ वर्ष रा. रसुलपुरा ता. जि. धाराशिव व गाडी मालक अमीर ईस्माईल पठाण रा. रसुलपुरा धाराशिव याची गाडी असल्याचे सांगीतले. चालकाने सांगितले की, सदर माल हा धाराशिव येथुन तौफीक भाई खुरेशी रा. ख्वाजा नगर धाराशिव यांचेकडुन भरलेला आहे व नेकनुरचा अतिक रा. नेकनुर ता. बीड याच्याकडे माल घेऊन जात असल्याचे कबूल केले आहे सदर मालाची तपासणी पशु वैद्यकीय अधिकारी व पशुडॉक्टर यांनी पाहणी केली असता ५ टन वजनाचे गायी, म्हसी व बैल यांचे हाडांचे सांगाडे, मुंडक्याच्या कवट्या, पायांचे सांगाडे व मांस व हाडे असे एकूण ८,००,०००/–रु चा मुददेमाल मिळून आलेला आहे. यात केज पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १)अकबर ईस्माईल टकारी, वय ४५ वर्ष, २) अमीर ईस्माईल पठाण, दोन्ही रा. रसुलपुरा ता. जि. धाराशिव ३). तौफीक भाई खुरेशी रा. ख्वाजा नगर धाराशिव ४). अतिक रा. नेकनुर ता बीड यांचे विरुध्द प्राण्याचा छळ प्रतीबंधक अधिनीयम १९६० चे कलम ११ (१) (a) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनीयम १९७६ कलम ५ (B) (C), महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ११९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. परंतु या प्रकरणात मोठी साखळी असून याचे धागेदोरे हे बीड, धाराशिव, संभाजीनगर, मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांपर्यंत पसरलेले असून या आरोपींच्या सखोल चौकशी करून यांच्यामागे असलेल्या यांच्या टोळ्यांची माहिती घेऊन अश्या सर्व आरोपींवर मकोका व एमपीडिए कायद्याअंतर्गत कठोर शिक्षा करावी अशी मागणी संघ जागरण गटाचे किशन चौहाण, विश्व हिंदु परिषदेच्या वतीने प्रशांत डोरले, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे मयुर भालेकर, भगवाधारी ग्रुपचे कृष्णा जाधव यांच्यासह सर्व गोरक्षकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

पान ४ वरून पुढे...

## लोकलढा अभ्यास...

रेशीम उद्योग व इतर उद्योगांमुळे हा परिसर विकसित झाला आहे. या भागातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे. लोकलढा आंदोलनात या सर्व योजनांचा उल्लेख अनेकवेळा आपल्याकडील ऊसतोड मजूरांनी केला होता. याच अनुषंगाने लोकलढा आंदोलनाने उजणी धरण व त्यावरील पाट योजनांचा अभ्यास दौरा केला. या अभ्यास गटामध्ये भाऊसाहेब जरांगे पाटील, समन्वयक दिनेश गुळवे, राहुल लोंढे, बालासाहेब शेरकर, वसंत पवळ, जीवन मोघे, गंगाधर चव्हाण, गणेश जाधव यांचा सहभाग होता. या अभ्यास गटाने उजणी धरण, भिमा–निरा संगम, धरणावरील कालवा योजना, ऊस व द्रांक्ष, नारळ, चिकू आदी फळबाग शेती, जर्सी गाय व म्हैस पालन, दूध उत्पादन, संकलन व वितरण, शेती जोडव्यवसाय व शेती पूरक व्यवसाय आदींची पाहणी केली, शिवाय शेतकरी व त्या–त्या क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्याकडून माहिती घेतली. उजणी धरण व कृष्णा खोऱ्यातील पाणी बीड जिल्ह्यातील वंचित व दुष्काळी भागाला मिळाले पाहिजे, पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे बीड जिल्ह्यात पाटपाणी योजना होणे गरजेचे आहे, शेतकरी आत्महत्या थांबून शेतकर्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी उपाययोजना सूचविण्यासाठी व शेतकर्यांमध्ये जागृती करण्यासाठी हा अभ्यास दौरा महत्वाचा असल्याचे या लोकलढा आंदोलनाचे समन्वयक राहुल लोंढे म्हणाले.

## ना. पंकजाताईंच्या...

आज संपादक आणि पत्रकारांच्या हस्ते स्टेशन रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. परळी कृषी उत्पन्न बाजार समितीपासुन वृक्ष लागवडीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माऊली फड, दीनदयाळ बँकेचे उपाध्यक्ष अॅड. राजेश्वर देशमुख, मार्केट कमिटीचे सचिव बलवीर

पान ४ वरून पुढे...

रामदासी, भाजपच्या ज्येष्ठ नेत्या डॉक्टर शालिनीताई कराड, पत्रकार सर्वश्री ज्ञानोबा सुरवसे, आत्मलिंग शेटे, मोहन व्हावळे, धनंजय आढाव, प्रवीण फुटके, महादेव शिंदे, धनंजय आरबुने, संजीब रॉय, सुकेशनी नाईकवाडे, धीरज जंगले, संभाजी मुंडे, बालासाहेब फड, विकास वाघमारे, श्रीराम लांडगे, बालाजी ढगे, सचिन स्वामी, भाजपाचे प्रशांत कराड, अश्विन मोगरकर, योगेश पांडकर, अॅड. अरुण पाठक, नितीन समशेट्टे, मोहन जोशी, वैजनाथ रेकने, श्रीपाद शिंदे, कुमार केदारी, सौ. माधुरी देशमुख, वर्षा जोशी, राजश्री कराड आदी उपस्थित होते.

## गायरानधारकांच्या आक्रोश...

तेव्हा या विषमतावादी व्यवस्थेची मस्ती जिरवायची असेल तर तुम्हा आम्हाला या गायरान भारत आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून रस्त्यावरच्या लढाईमध्ये उतरून न्याय मिळवून घ्यावा लागेल. त्यासाठी गुरुवार दि १०–७–२०२५ रोजीच्या गायरानधारकांच्या आक्रोश मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने सामील होऊन प्रशासनाला एकीची ताकद दाखवूया असे आवाहन आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून तर परमेश्वर उजगरे यांच्या वतीने करण्यात आले आहे. सविस्तर वृत्त असे की, गुरुवार दिनांक १०–०७–२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता गायनधारकांचा आक्रोश मोर्चा वडवणी तहसीलवर धडकणार आहे. या मोर्चाला बीड जिल्ह्यातूनच नव्हे तर मराठवाड्यामधून कार्यकर्ते मान्यवर व गायरानधारकांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेशजी घोडे हे करणार असून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकामधून या मोर्चाला सुरुवात होणार आहे टिपू सुलतान चौक, वसंतरावजी नाईक चौक, संविधान चौक, जिवाजी महाले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून, छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे तहसीलकडे या मोर्चाचे प्रस्थान होणार आहे. तरी या गायरानधारकांच्या आक्रोश मोर्चाला लाखोंच्या संख्येने

पान ४ वरून पुढे...

उपस्थित राहावे असे आवाहन परमेश्वर उजगरे, अरुण आव्हाड, वडवणी तालुका अध्यक्ष महादेव आव्हाड, विलास कारके, लक्ष्मण आवाड, पिंटू आडागळे, बळीराम मस्के, राजेश कांबळे, अशोक ढगे व आझाद क्रांती सेना वडवणी तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिक्षकांचे निवृत्ती...

दिलेल्या आहेत .सदरील शिष्टमंडळामध्ये राज्य अध्यक्ष: अनिल जाधवर, महासचिव :सुभाष जगताप, उपाध्यक्ष: अभिजीत तांदळे, भगीरथ मस्के हे उपस्थित होते .

## छत्रपती संभाजीनगर...

मत्स्यउद्योजक, रिव्हर रँन्चिग, मत्स्यपर्यटन, सहकार, सामाजिक, प्रचार–प्रसार या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी, व्यक्ती, संस्था, कंपन्या आदींना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात विविध योजनांबरोबरच मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने होणाऱ्या फायद्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याने जास्तीत जास्त मत्स्यव्यवसायिकांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा. अधिक माहितीसाठी ८७८८०९१६४९ व ९६६५६३२७९३ या क्रमाकांवर संपर्क साधवा, असे आवाहन पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे यांनी केले आहे.

## उपमुख्यमंत्री अजितदादा....

बक्षिस वितरण सोहळा होणार आहे . तसेच प्रसिद्ध व्याख्याते महेश पाटील सर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. तसेच या सेवा संकल्प सप्ताहात ८ दिवस, दररोज विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्येआरोग्य तपासणी,मोफत रक्तदाब व

पान ४ वरून पुढे...

मधुमेह तपासणी शिबीर, एपीएल फॉर्मस् डीबीटी योजना व शिधापत्रिका ऑनलाइन करुन देणे, घरकुल व विविध शासकीय योजना तक्रार निवारण,पर्यावरण संवर्धनासाठी एक अनोखा उपक्रम प्रत्येक नागरिकाला एक वृक्ष भेट!आधार कार्ड दाखवा व वृक्ष घेऊन जा उपक्रम,संजय गांधी निराधार योजना लाभार्थी यांचे आधार सिडीग, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी, डोमिसाईल आदी कागदपत्र एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी विद्यार्थी विविध प्रमाणपत्र कॅम्प,बांधकाम कामगार नोंदणी अभियान: नवीन नोंदणी व नूतनीकरणासाठी विशेष सोय,पक्षाशी जोडून घेण्यासाठी सुवर्णसंधी: राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सदस्य नोंदणी अभियान आदी कार्यक्रम, उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे सर्व कार्यक्रम व उपक्रम होणार आहेत. या सेवा संकल्प सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच या सेवा उपक्रमांचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके व शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी व सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी कॉंग्रेस परळी वैजनाथ यांनी केले आहे.

## राज्य शासनाच्या....

आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पालकमंत्री अजितदादा, बीडच्या विमानतळाईतकीच जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या धोकादायक शाळांची काळजी घ्या

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी मंजुर केलेल्या बीड जिल्हा विकासाचा ७७५ कोटी रुपयांचा आराखडा असताना आतापर्यंत केवळ ४० लाख रुपये निधी उपलब्ध झाले असुन हा निधी बीडच्या प्रस्तावित विमानतळाच्या जागेच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था असुन मोडकळीस आलेल्या शाळांचे भिंती, छप्पर कोसळुन विद्यार्थी जखमी होण्याच्या घटना घडत आहेत.गेल्या आठवड्यात पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना घडली नाही परंतु धारूर तालुक्यातील घागरवाडा येथील छताच्या भाग डोक्यात कोसळुन विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधांची विमानतळापेक्षा जास्त आवश्यकता असुन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विमानतळासाठी जेवढी काळजी करत आहेत तेवढीच काळजी या मोडकळीस आलेल्या धोकादायक शाळांमधील विद्यार्थ्यांची घेऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार




कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०७ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कागदी विमान उडवत विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार , शेख मुस्ताक,माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष आप, रामधन ज्या बीड जिल्हाध्यक्ष (इंटक)आदी सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन दिले.

### •५५ कोटींचा प्रस्ताव २ वर्षांपासून धुळखात पडुन

**५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्ती करीता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रूपयांचा निधी आणि ५१९ धोकादायक वर्ग खोल्यांच्या बांधकाम व पत्र्यांच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमधील ३८ वर्गखोल्या बांधकामासाठी असे एकुण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रशासनाकडून २ वर्षांपासून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.मात्र याकडे शासनाचे दुर्लक्ष असुन निधी देण्यात हात आखडता घेतला जात असल्याचे वास्तव दुर्दैवी आहे.**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक मोडकळीस आलेल्या असुन त्याठिकाणी अध्यापन करण्यात येऊ नये अशा शिक्षण विभागाने कळविले आहे.तर ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती आणि ८५६ वर्गखोल्यांची मोठ्या दुरुस्तीची गरज आहे.तर ७८० शाळांमध्ये वीजपुरवठा नसल्याने डिजिटल शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. उघड्यावर भरणाऱ्या, झाडाखाली, पत्र्यांच्या शेडमध्ये,किरायाच्या रूममध्ये भरणा-या शाळा, पावसाळ्यात गळक्या ईमारती,दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधांची वानवा आहे.



*बीड: आषाढी एकादशीच्या निमित्ताने संस्कार विद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित केले होते. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषा स्पर्धा, भजन-कीर्तन, तसेच एकादशीचे महत्त्व विषद करणारे भाषणे आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आली*



*नीट परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवत जिल्ह्याचे नाव उज्वल करणारे धानोरा रोड परिसरातील अनुराग बाबासाहेब मोरे यांचा सत्कार समारंभ आयोजित केला यावेळी उपस्थित शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रतन गुजर, विठ्ठल गुजर, सुनील गुजर, पत्रकार नितेश उपाध्ये यांच्यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.*



*कै.जयदत्तजी केंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेमार्फत किड्स पॅशन स्कूली दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. दिंडी सोहळ्याचे नियोजन स्कूलच्या प्रिन्सिपल सौ.वर्षा केंडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी केले.बाळ चिमुकले वेगवेगळ्या वेशभूषेमध्ये तयार होऊन आले होते. याप्रसंगी अगदी आनंदी वातावरणात संस्थेच्या अध्याधिका श्रीमती अंजनाताई केंडे आणि पालक वर्ग यांच्या हस्ते आरती घेण्यात आली. परिसरातील भगवान बाबा मंदिरात पायी दिंडी काढण्यात आली. सर्व बाळ चिमुकल्यांनी दिंडी चा आनंद मनसोक्त घेतला.*

# जुगार अड्ड्यावर छापा, ७०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर पोलिसांनी दि. ०८.०७.२०२५ रोजी मौजे मैंदा येथे सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून ७ जुगारींना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि तीन मोटारसायकलींसह एकूण सुमारे ७०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध धंद्यांना चाप बसल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोउपनि गोलवाल साहेब यांना गुप्त बातमीदारामार्फत मैंदा गावातील अर्जुन अंकुशकर यांच्या घराशेजारील लिंबाच्या झाडाखाली काही इसम तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे, पोउपनि श्री. गोलवाल साहेब यांनी प्रभारी अधिकारी सपोनि श्री. घुगे साहेब यांना कळवून सपोनि मधुसूदन घुगे, पोउपनि अर्जुन गोलवाल, पोशि/८८७ अविनाश सानप, पोशि १२६० दिलीप सोनवणे, पोशि १९४४ वैजिनाथ मगर यांच्या पथकासह दोन पंचांना घेऊन दुपारी ३:४५ वाजता छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचताच अर्जुन अंकुशकर यांच्या घराशेजारील लिंबाच्या झाडाखाली मोटारसायकली गोलाकार लावून ७ इसम पत्त्यांवर पैसे लावून तिर्रट जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांना पाहताच जुगार खेळणारे इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. मात्र, एक इसम आपली मोटारसायकल सोडून पोलिसांची नजर चुकवून पळून जाण्यात यशस्वी झाला. अर्जुन ईश्वर अंकुशकर (वय ३८, रा. मैंदा, ता.जि. बीड), रणजितसिंग नानकसिंग टाक (वय ३३, रा. वडवणी, ता.जि. बीड), संतोष रामनाथ मुळे (वय ३५, रा. बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड), शंकर पांडुरंग ढगे (वय २७, रा. चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड), सुभाष हिरामण चव्हाण (वय ३६, रा. ढोरवाडी परभणी तांडा, ता.जि. बीड), आतिष हरिदास मस्के (वय २३, रा. बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड), .विलास बापुराव बापमारे (वय ३८, रा. मैंदा, ता.जि. बीड), यांच्या ताब्यातुन एकूण २३८८०/- रु रोख, ७ मोबाईल व ३ दुचाकी असा एकूण रु. ३,७३,८८०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोउपनि अर्जुन गोलवाल यांनी दोन पंचांसमक्ष जागेवरच पंचनामा करून मुद्देमाल ताब्यात घेतला आणि आरोपींसह पिंपळनेर पोलीस ठाण्यात हजर झाले. याप्रकरणी पोकॉ/२०२१ शशिकांत अण्णासाहेब ढाकणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, कलम १२ (अ) नुसार वरील ७ आरोपी आणि पळून गेलेल्या अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि मधुसुदन घुगे, पोउपनि अर्जुन गोलवाल, पोलीस अंमलदार अविनाश सानप, दिलीप सोनवणे, वैजिनाथ मगर यांनी केली आहे.




# शिवणी येथे 10 जुलैपासून आषाढ पौर्णिमा वर्षावासास प्रारंभ

## धम्मदेसना व भोजन-खिरदान कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

महाविहार धम्मभूमी मौजे शिवणी येथे आषाढ पौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. धम्मामध्ये आषाढ पौर्णिमेला अनन्य साधारण महत्व आहे. या गुरुवार दि.१० जुलै रोजी आषाढ पौर्णिमेपासून वर्षावासाला प्रारंभ होत असून धम्मदेसना खिरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सर्व उपासक, उपासिका यांनी मोठ्यासंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. मौजे शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदंत आनंद कौसल्यायन नगर येथे हिंगोली येथील पु.भिक्खु पय्यावर्धन, व पु.भिक्खु चंद्रमुनी, पु.भिक्खु धम्मघोष हे धम्मदेसना देणार आहेत. तर सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगावचे प्रा. संजय बागुल यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच कंबोडिया बुध्द धम्म सहल यशस्वी करुन आल्याबद्दल प्रदीप वीर, मंगलताई प्रदीप वीर, मंदाताई रोहिदास मस्के यांचा स्वागत समारंभ होणार आहे.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वा. ऐतिहासिक बोधी वृक्षाची वंदना होऊन सकाळी १० ते १२ या दरम्यान खिरदान व भोजदान तर दुपारी १२ वाजता त्रिसरण-पंचशील-बुध्दवंदना होणार असून त्यानंतर दुपारी १२.३० वा. पाहुण्यांचा सत्कार व मार्गदर्शन पु.भिक्खु यांचे धम्मदेसना होणार आहे. उपासिका सोजरबाई बन्सी सवाई यांच्यावतीने भोजनदान तर उपा.रावसाहेब सुंदरराव ऊवणने यांच्यावतीने सर्वांना खिरदान देण्यात येणार आहे. सर्व बौद्ध उपासक, उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून कार्यक्रमास उपस्थित राहून धम्मदेसनेने लाभान्वित व्हावे.

# विठ्ठल- रुक्मिणी,संत, बाल वारकऱ्यांच्या वेशभूषेत २०० विद्यार्थी सहभागी



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील माईलस्टोन प्री स्कूल, छत्रपती कॉलनी बीड च्या वतीने आषाढी एकादशी निमित्त स्कूल ते छत्रपती कॉलनी येथील विठ्ठल मंदिरापर्यंत बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या बाल-दिंडीत सहभागी झालेल्या विठ्ठल- रुक्मिणी, संत, बाल वारकऱ्यांनी केलेल्या वेशभूषेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीत २०० विद्यार्थी सहभागी झाले. आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला बीड शहरातील माईलस्टोन प्री स्कूल, छत्रपती कॉलनी बीड येथे बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

# बळीराजाच्या बैलगाडा शर्यतीचा थरार काडीवडगावच्या मैदानात

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव शिवारात १३ जुलै बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे ,पहिल्या सात विजेता बैल जोड्यांना यावेळी लाखो रुपये जिकण्याची संधी उपलब्ध, होणार आहे, यामुळे या बैलगाडी शर्यतीत सामील मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आव्हान या बैलगाडा शर्यतीचे आयोजक, प्रकाश झाटे, नितीन घुगे सतीश पांडव व समस्त वडवणी तालुक्यातील तरुण वर्गांकडून करण्यात आले आहे,

आजवर मोठ्या रेसकोर्सवर, टिव्ही आणि मोबाईलच्या पडद्यावर शेतकरी पुत्रांनी घोड्यांच्या शर्यती पाहिल्या पण आपल्या घरच्या अंगणात वाढलेला सर्जा-राजा शर्यतीत भाग घेऊन विजयी होतो आणि मालकाचा मान वाढवतो, एवढा आत्मविश्वास आणि अभिमान देणारी परंपरा फक्त बैलगाडा शर्यतीतच अनुभवायला मिळते.

तामिळनाडूतील जनतेने जल्लीकट्टूच्या माध्यमातून आपली संस्कृती, आपली अस्मिता केंद्राने बंदी घातल्यावर राज्यव्यापी आंदोलन करून व सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढून टिकवली, अगदी तसंच आपल्या महाराष्ट्रानेही बैलगाडा शर्यतीवरील बंदीविरोधात ठामपणे उभं राहत, हा आपल्या शेतकऱ्यांच्या जीवनाचा, संस्कृतीचा आणि संघर्षाचा भाग पुन्हा जिवंत केला, परंतु तो जिवंत राहिला पश्चिम महाराष्ट्र पुरताच, आता कुठे सोशल मीडियाच्या माध्यमातून तो आपल्याकडे सरकतोय.



पोटच्या लेकराएवढं प्रेम शेतकरी आपल्या बैलांवर करतो, एखादा वस्ताद आपले पैलवान आखाड्यात उतरवतो, तसंच प्रेम आणि जिव्हाळ्याने बैलगाडा मालक आपले बैल शर्यतीच्या मैदानात उतरवत असतात, बैलगाडा शर्यत आपल्या महाराष्ट्राच्या अस्सल कृषी संस्कृतीचं प्रतीक आहे.

सुदैवाने - दुर्दैवाने आज शेतीत यांत्रिकीकरण वाढल्याने बैलांची संख्या दिवसेंदिवस कमी होतेय, काही गावांत तर पोळ्यासारख्या सणाचं स्वरूपच बदललं; ट्रॅक्टरची मिरवणूक काढून पोळा साजरा होतोय. पण, खरंच, वावर कसण्यासाठी, जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी बैलांशिवाय पर्याय आहे का हे सर्व बदल आपल्याला स्वीकारावे लागले असले तरी बैल आणि त्यांचं महत्व कधीच कमी व्हायला नको, म्हणूनच, अनेक वेळा शेतकरी आंदोलनांमध्येही आम्ही बैलगाडी घेऊनच तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गेलोय बैलांप्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अलीकडेच वडवणीच्या शेजारी असलेल्या मैंदा गावातील मैदानावर भरणाऱ्या आठवडी बैलगाडा शर्यतीमुळे तालुक्यातील तरुणांमध्ये निर्माण झालेल्या कुतूहलाला वाव देण्यासाठी व तालुक्यातील एखाद्या गावात तरी आज ना उद्या बैलांचे नावाजलेले बाजार पुन्हा फुलावे यासाठी बैलगाडा शर्यतीचा अट्टाहास तालुक्यातील बैलगाडा प्रेमी पोरांनी केला आहे.

बैलगाडा शर्यतीची घोषणा करणे सोपं आहे, पण त्याचं योग्य आणि सुरक्षित आयोजन करणं खूप मोठं जबाबदारीचं काम असत; योग्य नियोजन, नियमानुसार आणि पारंपरिक पद्धतीने तालुक्यात प्रथमच हा जिव्हाळ्याचा सोहळा बैलगाडा प्रेमी घेऊन येत आहेत.

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र
● https://marathwadapatra.com

बुधवार, दि.०९ जुलै २०२५ पान ४

## छत्रपती संभाजीनगर विभागातील मत्स्य व्यावसायिकांचा होणार सन्मान

**•पुण्यातील कृषी महाविद्यालय येथे शनिवारी आयोजन**

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिनाचे औचित्य साधून केंद्र व राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसायविषयक विविध योजनांची जनजागृती आणि पुणे व छत्रपती संभाजीनगर द्विविभागस्तरीय मत्स्यव्यावसायिकांचा सन्मान सोहळा शनिवार, १२ जुलै रोजी पुण्यातील कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये मत्स्यबीज उत्पादन, मासेमारी, मत्स्यशेती, केज कल्चर, बायोफ्लॉक कल्चर, शोभिवंत मत्स्यव्यवसाय, मत्स्यखाद्य, शितसाखळी, विपणन, नाविन्यपूर्ण ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाटोदा तालुक्यातील बसथांब्यांवर निवारा शेड नसल्याने प्रवाशांचे हाल

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा शहरातील पारगाव चौक,राज मोहम्मद चौक,तसेच तालुक्यातील चुंबळी फाटा,वाजरा फाटा आदी ठिकाणी असलेल्या बसथांब्यांवर निवारा शेड नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक व महिलांना उन्हा-पावसात थांबावे लागत असल्याने त्यांचे हाल सुरू आहेत.या समस्येबाबत सावता सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षा सौ. स्वाती कातखडे यांनी आवाज उठवला असुन त्यांनी स्पष्ट शब्दांत प्रशासनाला मागणी केली की, पाटोदा शहर व तालुक्यातील सर्व बसथांब्यांवर तातडीने निवारा शेड उभारण्यात यावेत. नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष होणे, हे शासनाच्या जबाबदारी पासून पळ काढणे आहे.

स्वाती कातखडे यांनी यापूर्वीही सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली असून, जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी त्या कायम कार्यरत आहेत. यावेळी त्यांनी इशारा दिला की, जर लवकरात लवकर पाटोदा तालुक्यातील बस थांब्यावर निवारा शेड उभारण्यात आले नाहीत, तर सावता सेना रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडेल.असा इशाराही सावता सेनेच्या महिला बीड जिल्हा अध्यक्ष स्वातीताई कातखडे यांनी दिला असुन गावा गावांतील बसथांब्यांवर बसण्यासाठी बाक व निवारा शेडचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या सगळ्या समस्या ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका ठरू शकतात, असेही त्या म्हणाल्या.या मागणीची दखल घेऊन प्रशासन काय पावले उचलते, याकडे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## थोडक्यात

### ना. पंकजाताईंच्या संकल्पनेतील ‘ग्रीन परळी’साठी पत्रकारही सरसावले

**स्टेशन रोडवर संपादक - पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण**



**परळी वै. । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खाप्रीतमताई मुंडे यांच्या संकल्पनेतील ग्रीन परळी, सुंदर परळीचे स्वप्न साकार करण्यासाठी भा.ज.पा.च्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात सुरु असलेल्या वृक्ष लागवड मोहिमेत आज परळीतील संपादक-पत्रकार उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. आज शहराच्या स्टेशन रोड परिसरामध्ये संपादक व पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पदाधिकारी, व्यापारी व नागरीकांची मोठी उपस्थिती होती. परळी शहर पूर्वीसारखे हरित व्हावे व आगामी काळात प्रदूषणाला आळा बसावा यासाठी ना. पंकजाताई मुंडे यांनी शहरात देशी वाणाचे वृक्ष लागवड कार्यक्रम आखला आहे. या कार्यक्रमात परळीकरांनी सहभागी व्हावे व आपल्या शहराचे वातावरण रम्य रहावे यासाठी भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी विविध क्षेत्रातील परळीकरांना सहभागी करून घेत मोठी वृक्ष लागवड मोहीम सुरु केली आहे. या अंतर्गत शहराच्या विविध भागात वृक्ष लागवड करण्यात येत आहे. ग्रीन परळी संकल्पना साकारण्यासाठी आज शहरातील संपादक आणि पत्रकार सरसावले आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

### गायरानधारकांच्या आक्रोश मोर्चाला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा: परमेश्वर उजगरे, महादेव आवाड

**वडवणी । प्रतिनिधी**

शिव, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, संत गाडगेबाबा,संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत भगवान बाबा, या महापुरुषांच्या संतांच्या महाराष्ट्रामध्ये माता भगिनी सुरक्षित नाहीत, गायरान धारकांना प्रशासन जमीन कसू देत नाही, जमीन ताब्यात घेण्याच्या सूचना करत आहे, गायरान धारक कसत असलेल्या जमिनीमध्ये मोठ मोठे प्रकल्प उभा करत आहे. म्हणून आझाद क्रांती सेना याला विरोध करत आहे. तसेच गायरानधारकांच्या मागण्या शासनाने मनावर घेऊन पूर्ण कराव्यात डायरेक्ट जमीन नावावर करावी, गायरानधारकांना विनाअट सातबारा द्याव्यात, राज्य सरकारची विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही ती मिळावी, या व इतर मागण्यांसाठी वडवणी तहसीलवर आझाद क्रांती सेनेच्या वतीने गायरानधारकांचा आक्रोश विराट मोर्चा निघणार आहे.वर्षानुवर्ष आम्ही अन्याय अत्याचाराचे शिकार झालेलो आहोत. आमची बेकी हीच अन्याय करणाराची ताकत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

### शिक्षकांचे निवृत्ती विषयक लाभ देण्यास प्रशासनाकडून दिरंगाई : संचालक कार्यालयापुढे कास्ट्राईबचा आंदोलनाचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठी आहे .शासन निर्णयानुसार शिक्षक अथवा कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांना मिळणारे अंशराशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ अतिशय महत्त्वाचे असतात आणि कर्मचाऱ्यांच्या हक्काचे असतात. परंतु अलीकडील काळामध्ये शासनाच्या उदासीन धोरणामध्ये तसेच संचालन कार्यालयाच्या शिक्षक विरोधी धोरणामुळे सेवानिवृत्तांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्यास दिरंगाई होत आहे . बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे एप्रिल २०२४ पासूनचे अंशराशीकरण व उपदान या रकमा प्रलंबित आहेत. म्हणजे किमान एका वर्षापासून या रकमा प्रलंबित आहेत . करिता कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर यांनी संघटनेच्या शिष्टमंडळासह शिक्षण संचालक प्राथमिक माननीय शरद गोसावी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली . सदरील चर्चेनुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदा कडून थकीत अंशराशीकरण व उपदान यांचा आढावा घेऊन या बाबीसाठी वित्त तरतूद करण्यात येणार आहे . तसेच सदरील थकीत असणारी देयके दोन-तीन महिन्याच्या आत पूर्णपणे टप्या - टप्या ने दिली जातील असे संचालक व संबंधित विभागाचे प्रशासन अधिकारी यांच्याकडून शिष्टमंडळास सांगितले गेले . परंतू एकटप्यात तात्काळ थकित रक्कम देण्याची संघटनेने प्रशासनाकडे मागणी केली . संघटनेच्या मागणीनुसार जुलै अखेरपर्यंत प्रलंबित असणारे सेवानिवृत्तांचे अंशराशीकरण व उपदान यासाठी वित्त तरतूद केली नाही तर १५ ऑगस्ट २०२५ रोजी संघटनेच्या वतीने शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिलेला आहे . निवेदनाच्या प्रती माननीय अजितदादा पवार साहेब उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, मा. शिक्षण सचिव , मा . शिक्षण आयुक्त पुणे यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# लोकलढा अभ्यास गटाची उजणी धरण, जलसेतू येथे भेट



**•नेत्रदीपक असा जलसेतू**

लक्ष्मी नृसिंह मंदिर येथे भिमा व निरा नदीचा संगम आहे. याच संगमावर नदीपासून दीडशे ते दोनशे फूट अंतरावर उंच असा जलसेतू ( पाण्याचा पूल) आहे. बारा फूट रुंद व पंधरा फूट उंच असलेल्या या सेतुमधून उजणीचे पाणी पंढरपूर, माढा, माळशिरस तालुक्याला जाते. असे विकासाच्या पाया ठरलेल्या व कोट्यवधी रुपये खर्चाच्या योजना बीड जिल्ह्यात कराव्यात अशी मागणी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, आप्पासाहेब महानोर, राहुल लोंढे, बालासाहेब शेरकर यांनी केली आहे.

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील लोकलढा आंदोलनातील शेतकरी अभ्यास गटाने उजणी धरण व त्यावरील पाट योजनांना भेट देऊन माहिती घेतली. शेतीसाठी पाण्याचा दुष्काळ दूर करून आपली शेती बारामती पॅटर्न प्रमाणे पाणीदार करण्यासाठी अशा योजना व्हाव्यात यासाठी जनजागृती व शासनाकडे मागणी हा अभ्यासगट करणार आहे. जायकवाडी धरणाचे पाणी बीड जिल्ह्यातील वंचित भागाला मिळावे, यासाठी लोकलढा आंदोलन गेल्या दीड वर्षापासून सतत संघर्ष करत असून शासनाकडे पाठपुरावाही करत आहे. टेंभूर्णी येथील उजणी धरणामुळे लाखो एकर जमीन पाण्याखाली आली आहे. हे धरण व त्यावरील पाट योजनांमुळे लाखो एकरवर ऊस, फळबागा तर आहेतच शिवाय दूध उत्पादन, ▶▶ उर्वरित पान २ वर

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. परळी वैजनाथ यांच्या वतीने 15 ते 22 जुलै 2025 सेवा संकल्प सप्ताह

**परळी । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस परळीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचा सेवा संकल्प सप्ताह १५ ते २२ जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके व शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी दिली आहे.

१५ जुलै २०२५ रोजी सकाळी ६ वा. योगासन स्पर्धा, सकाळी १०:०० वा सेवा संकल्प सप्ताह उदघाटन व धनंजय मुंडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा सकाळी ११ वा. मृदंग स्पर्धा,,सायं ७:०० ते १०:०० वा .भावरत्न गुरुदास ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन १६ जुलै २०२५ रोजीयुवा पिढीसाठी सामाजिक भान जपणारे मनोरंजनात्मक व्यासपीठ- रिल्स स्पर्धा ,१७ जुलै २०२५: महिलांसाठी भजन स्पर्धा १८ जुलै २०२५:शालेय सांस्कृतिक महोत्सव (शहर)१९ जुलै २०२५:शालेय सांस्कृतिक महोत्सव (ग्रामीण) विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी.२० जुलै २०२५; आरोग्य शिबीर सर्वांसाठी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन२१ जुलै २०२५ सामान्य ज्ञान ,२२ जुलै २०२५ ना. अजितदादा पवार यांचा अभिष्टचिंतन (सकाळी १०:३० वा.) परळी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, शालेय साहित्य वाटप व ▶▶ उर्वरित पान २ वर



## बातम्या देऊनही राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांचा गलथान कारभारामुळे रघुनाथराव पेट्रोल पंपाजवळ एसटीचा भीषण अपघात याला जबाबदार कोण ?

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी अंबाजोगाई महामार्गावरील कन्हेरवाडी येथे असणाऱ्या रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ बसचा भीषण अपघात झाला त्यामध्ये प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळाली वारंवार बातम्या देऊन आणि अधिकाऱ्यांना सांगून सुद्धा महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा भीषण प्रकार घडला घडला असून याला जबाबदार कोण असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केला आहे. काल रात्री हा अपघात झाला आहे. थातूरमातूर रेडियम चे रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी काम केल्याने ते निघून गेले परिणामी त्या ठिकाणी अपघात झाला या अपघातामध्ये बसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यामध्ये असणाऱ्या प्रवाशांना सुद्धा शारीरिक हानी भोगावी लागली आहे. अशा वारंवार घटना या अगोदरही याच ठिकाणी घडल्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आहे. याकडे संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष दिले असते तर अशी घटना घडली नसती भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी योग्य ती उपयोजना करणे गरजेचे आहे. अपघातामध्ये माणसांचा बळी जाण्याची शक्यता आहे त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा लागेल अन्यथा रेडियमचे काम करून घ्यावे अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.






## राज्य शासनाच्या ‘उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४’साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

जिज्ञासा व मेडिव्हिजन, बीड च्यावतीने....

# श्री क्षेत्र नारायण गड येथे 1260 भक्तांची भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**•विठूनामात आरोग्यसेवा - नारायण गडावर श्रद्धेची व सेवाभावाची गंगा**

**बीड । प्रतिनिधी**



आषाढी एकादशीनिमित्त जिज्ञासा व मेडिव्हिजन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र नारायण गड येथे मोफत आरोग्य तपासणी व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन खलापुरी गावाचे सरपंच मा. गणेश घोलप, डॉ. मंगेश आधारे, बीड विभाग संघटनमंत्री ज्ञानेश्वर उद्देवाल व सहमंत्री आशीष वारे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या आरोग्य शिबिरात २२ डॉक्टरांच्या सेवेमुळे १२६० भाविक भक्तांची आरोग्य तपासणी, बीपी तपासणी व दंत तपासणी, जनरल चेकअप करण्यात आले. यासोबतच सर्व तपासणी लाभार्थ्यांना मोफत औषधे व गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राघवेंद्र कुलकर्णी, पवन बांगर, स्वानंद गाडगे, प्रद्युम्न परजने, प्रणव तवार, धनंजय मुटकुळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. हे शिबिर आरोग्यसेवा व सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त व समाधानकारक ठरले.

CMYK